**<u>रे.दि.मु.क्र. ४१/१९९९ मधील निशाणी १०७ वरील आदेश</u>**

(CNR NO.MHST-07000851-1999)

शहाजी रामचंद्र वाघ --- वादी

वि.

सिमाराम खाशाबा वाघ व इतर --- प्रतिवादी

सदरहू अर्ज वादीने, मयत प्रतिवादी क्र. ८ यांचे नाव दाव्यातून कमी करून दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. दाव्यात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे. त्यावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. वादीचे कथन असे की, प्रतिवादी क्र. ८ वत्सला रामकृष्ण वाघ हया दि. १७/०८/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. मयत प्रतिवादी क्र. ८ हया रे.दि.अपील क्र. ६०/२०१४ मध्ये रिस्पॉडंट क्र. २ म्हणून सामील होत्या. अपील चालू असताना प्रतिवादी क्र. ८ हया मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर दाखल केले आहेत. तसेच, सदरचे प्रकरण हे फेरचौकशीसाठी मा. कोर्टात रिमांड करण्यात आले आहे. तरी, मयत प्रतिवादी क्र. ८ यांचे नाव दाव्यातून कमी करून दुरूस्ती करण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे वकीलांनी कथन केले की, सदरचा अर्ज विलंबाने दाखल केलेले आहे. करीता, सदरचा अर्ज खर्चावर नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी क्र. ८ हया मयत झाल्याबाबत मृत्यूप्रमाणपत्र दाखल केले असून प्रतिवादी क्र. ८ वत्सला रामकृष्ण वाघ हया दि. १७/०८/२०१८ रोजी मयत झाल्याबाबत मृत्यूप्रमाणपत्र (नि.१०६/१) वरून दिसून

येते. दाव्यामध्ये तांत्रीक दोष राहू नये म्हणून दाव्यात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. सदरची दुरूस्तीची मागणी ही दाव्याच्या गुणावगुणावर निकाल देण्यासाठी महत्वाची आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच, सदर दाव्याचे दुरूस्तीमुळे झालेल्या विलंबाबाबत योग्य तो खर्च लावणे संयुक्तीक ठरेल. सबब, खालील आदेश.

**– : आ दे श :–**

१. वादीचा अर्ज (नि.१०७) मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्यावी व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2026.07.02 16:48:38 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. ०२/०७/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.

ता.कराड, जि.सातारा.